सीएनआरएमएचआरजी०७-००००७०-२०१९

**नि.दि.दा.क. १३/२०१९**

श्री. नंदकुमार पांडुरंग राऊत .... वादी

विरुध्द

सौ. शैला रोंग्या साळोखे ... प्रतिवादी

**आदेश निशाणी २२ वर**

(घोषित दिनांक २९/०१/२०२१)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाव्यात पक्षकार समाविष्ट करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी नं.१ हिने दावा मिळकतीपैकी सर्व्हे नंबर ८/८, ८/१५ व ८/१७ या मिळकती दिनांक ३० मार्च २०१९ रोजीचे क.११०२/२०१९ च्या नोंदणीकृत खरेदीखताने महादेव परबत पटेल, सारंग सुरेश कराळे व भगवान बाळकृष्ण चंचे यांना खरेदी दिलेल्या आहेत. त्यामुळे सदर खरेदीदार यांना दाव्यात सामील करण्यासाठी दावा दुरुस्तीची परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादी क.१ व २ तर्फे या अर्जाला म्हणणे दाखल करुन सदर अर्जास सक्त हरकत दर्शविली. त्यांनी पुढे असे सांगितले की, ज्या खरेदीखताचे अनुषंगाने नियोजित प्रतिवादींना दाव्यात सामील करण्याचे आहे त्या खरेदीखताचे मुल्य विचारात घेता सदर खरेदीखत हे या न्यायालयाच्या आर्थिक क्षेत्राधिकाराबाहेरील आहे. त्यामुळे सदर पक्षकारांना दाव्यात सामील केल्यास दाव्यास क्षेत्राधिकाराची बाधा निर्माण होईल. तसेच सदर नियोजित प्रतिवादींना दाव्यात सामील केल्यास दाव्याचे स्वरुप बदलेल. त्यामुळे अर्ज फेटाळण्याची त्यांनी विनंती केली. उर्वरीत प्रतिवादींनी या अर्जाला म्हणणे दाखल केले नाही.

४. वादीतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीतर्फे या अर्जासोबत नि.२३/ड खाली ता.३०/०३/२०१९ च्या खरेदीपत्राची छायांकित प्रत दाखल केली आहे. खरेदीपत्रावरील मजकूरातून दाव्यातील सर्व्हे नं. ८/८, ८/१५ व ८/१७ या मिळकतीतील त्यांचा हिस्सा प्रतिवादी नं.१ यांनी महादेव परबत पटेल, सारंग सुरेश कराळे व भगवान बाळकृष्ण चंचे यांना खरेदी दिलेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये महादेव परबत पटेल, सारंग सुरेश कराळे व भगवान बाळकृष्ण चंचे यांचा हितसंबंध निर्माण झाला असल्याने त्यांना दाव्यात सामील करणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना दाव्यात हजर होवून म्हणणे मांडण्याची संधी प्राप्त होईल.

५. दाव्याची न्यायचौकशी अद्याप सुरु झालेली नाही. या अर्जामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही अथवा प्रतिवादींना कोणतेही नुकसान होत नाही. करिता आदेश–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर.

२. प्रस्तावित महादेव परबत पटेल, सारंग सुरेश कराळे व भगवान बाळकृष्ण चंचे यांना प्रतिवादी क्र.१०, ११ व १२ म्हणून दाव्यात सामील करावे.

३. वादीने अर्जात सुचवलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांचे आत दाव्यामध्ये करावी व दुरुस्त प्रत सादर करावी.

४. दावा दुरुस्ती केल्यानंतर प्रस्तावित प्रतिवादी महादेव परबत पटेल, सारंग सुरेश कराळे व भगवान बाळकृष्ण चंचे यांना दावा समन्स काढण्यात यावे.

Digitally signed
by Shraddha
Jitendra Dolare
Date: 2021.01.30
15:44:42 +05'30'

कर्जत
दिनांक : २९/०१/२०२१ ( श्र.जि. डोलारे )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कर्जत